# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** **विकास योजना – नागपूर**

**{नगर रचना विभाग}** मौजा- बाबुलखेडा, खसरा क्र. ५७/२, ५८/२५ व मौजा- अजनी, खसरा क्र. १२२ येथील एम्प्रेस मिल को. ऑप. हॉऊ. सोसायटी मधील मंजूर विकास योजनेनूसार "फायर स्टेशन (एमएस-२६)" क्षेत्र ०.६९१२ हेक्टर आर. जागेपैकी ०.१०५ हेक्टर आर. जागा या आरक्षणातून वगळून "सार्वजनिक–निमसार्वजनिक" या उपयोगात समाविष्ट करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(अ) अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वीत करण्याबाबत.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये शासन, अधिसूचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस -२४९६-२६४३ -प्र.क्र. ३००(अ) -९७ - नवी - ९, दि ०७ जानेवारी २००० अन्वये मंजुर झाली असून ती दि ०१ मार्च २००० पासून अंमलात आली आहे तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४००-१६२८-सी.आर.-२००-नवि-९, दि. १०.०९.२००१ अन्वये मंजुर झाली असून ती दि. २१.०९.२००१ पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसूचना क्र. टिपीएस-२४०१-८८५-प्र.क्र.-७६/नवि-९ दि. २७.०२.२००२ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळून उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. तथापी शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२४१९-१४१९- प्र.क्र. - १५४/२०१९-नवि-९, दि.२७.०८.२०१९ अन्वये संपुर्ण क्षेत्राकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तद्नंतर शासनाकडील शासन निर्णय क्र. टिपीएस -२४१९/ प्र.क्र. १५४ (भाग-१)/२०१९-नवि-९, दि. ०९.०४.२०२१ अन्वये ७ योजनेतील स्मार्ट सिटी अंतर्गत नगर रचना योजनेतील क्षेत्र वगळून पुन्हा त्या क्षेत्राकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

शासनाने दि. ०१.०३.२००० रोजी व दि. १०.०९.२००१ मंजूर केलेल्या सूधारीत विकास योजनेनूसार मौजा - बाबुलखेडा, खसरा क्र. ५७/२, ५८/२५ व मौजा - अजनी, खसरा क्र. १२२ येथील एम्प्रेस मिल को.ऑप. हाऊ. सोसायटी मधील "आ.क्र. एमएस-२६ (फायर स्टेशन)" क्षेत्र - ०.६९१२ हेक्टर आर. जागा राखीव असून उक्त आरक्षणाचे समुचित प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिका आहे. सदर आरक्षणाखालील जागेकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे.

शासन निर्णय क्र. नासुप्र-१६२४/प्र.क्र. ४०/नवि-२६, दि. १६.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयानूसार मौजा – बाबुलखेडा, मौजा अजनी इम्प्रेस मिल को.ऑप.हॉऊ. सो.लि. येथील सूमारे १०५४.८० चौ.मी. जागेवर अखिल भारतीय ओबीसी भवन बांधण्याकरीता शासनाने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयातील "अट क्र. १ मध्ये शासनाने दि. १० सप्टेंबर २००१ रोजी मंजूरी दिलेल्या सूधारीत विकास योजनेनूसार खसरा क्र. ५७/२, ५८/२५, मौजा- बाबुलखेडा, खसरा क्र. १२२, मौजा – अजनी, एम्प्रेस मिल को.ऑप. हाऊ. सोसायटी लि. च्या अभिन्यासातील जागा "फायर स्टेशन (एमएस-२६)" या आरक्षणाने प्रस्तावित आहे. सदर मागणी केलेली १०५४.८० चौ.मी. जागा फायर स्टेशन करीता आरक्षित असल्यामुळे आरक्षणाच्या फेरबदलाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ नूसार प्रस्ताव समुचित नियोजन प्राधिकरण नागपूर महानगरपालिका यांना नागपूर सूधार प्रन्यासव्दारे सादर केल्यानंतर त्यास नागपूर महानगरपालिकेने शासनास सादर करून याबाबत मंजूरी प्राप्त करून घेण्यात यावी, असे नमूद आहे. शासनाने दि. १६.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयामध्ये मौजा - बाबुलखेडा, खसरा क्र. १२२ येथील मंजूर विकास योजनेतील "आरक्षण क्र. एमएस-२६ (फायर स्टेशन)" करीताच्या राखीव जागेपैकी १०५४.८० चौ.मी. क्षेत्राची जागा उक्त आरक्षणातून वगळून सार्वजनिक/निमसार्वजनिक विभागात समाविष्ठ करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-३७ अन्वये कार्यवाही करण्याबाबत निदेश दिलेले आहे.

मौजा- बाबुलखेडा, खसरा क्र. ५७/२, ५८/२५ व मौजा- अजनी, खसरा क्र. १२२ येथील एम्प्रेस मिल को. ऑप. हॉऊ. सोसायटी मधील मंजूर विकास योजनेनूसार "आरक्षण क्र. एमएस-२६ (फायर स्टेशन)" क्षेत्र ०.६९१२ हेक्टर आर. राखीव जागेपैकी ०.१०५ हेक्टर आर. जागा या आरक्षणातून वगळून "सार्वजनिक -निम-सार्वजनिक" या विभागात समाविष्ट करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(अ) अन्वये फेरबदल प्रस्तावित करण्यात येत आहे.

या करीता प्रशासकीय ठराव पारीत करून सदर फेरबदल प्रस्तावाबाबत संपूर्ण वैधानिक कार्यवाही केल्यांनतर सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करणे आवश्यक आहे. याकरीता सदर फेरबदलाची सूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे त्यावर प्राप्त आक्षेप/ हरकतीवर सूनावणी देऊन योग्य निर्णय घेऊन व तदनंतर उक्त प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वीत करणेकरीता प्रस्तावित आहे. फेरबदलाचा सदर विषय विचारात घेणे.

(सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.)

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 72/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 28/06/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपसंचालक, नगर रचना विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार **<u>विकास योजना – नागपूर</u>**मौजा- बाबुलखेडा, खसरा क्र. ५७/२, ५८/२५ व मौजा- अजनी, खसरा क्र. १२२ येथील एम्प्रेस मिल को. ऑप. हॉऊ. सोसायटी मधील मंजूर विकास योजनेनूसार "फायर स्टेशन (एमएस-२६)" क्षेत्र ०.६९१२ हेक्टर आर. जागेपैकी ०.१०५ हेक्टर आर. जागा या आरक्षणातून वगळून "सार्वजनिक—निमसार्वजनिक" या उपयोगात समाविष्ट करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(अ) अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वीत करण्याबाबत.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये शासन, अधिसूचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस -२४९६-२६४३ -प्र.क्र. ३००(अ) -९७ - नवी - ९, दि ०७ जानेवारी २००० अन्वये मंजुर झाली असून ती दि ०१ मार्च २००० पासून अंमलात आली आहे तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४००-१६२८-सी.आर.-२००-नवि-९, दि. १०.०९.२००१ अन्वये मंजुर झाली असून ती दि. २१.०९.२००१ पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसूचना क्र. टिपीएस-२४०१-८८५-प्र.क्र.-७६/नवि-९ दि. २७.०२.२००२ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळून उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. तथापी शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२४१९-१४१९- प्र.क्र. - १५४/२०१९-नवि-९, दि.२७.०८.२०१९ अन्वये संपुर्ण क्षेत्राकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तद्नंतर शासनाकडील शासन निर्णय क्र. टिपीएस -२४१९/ प्र.क्र. १५४ (भाग-१)/२०१९-नवि-९, दि. ०९.०४.२०२१ अन्वये ७ योजनेतील स्मार्ट सिटी अंतर्गत नगर रचना योजनेतील क्षेत्र वगळून पुन्हा त्या क्षेत्राकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

शासनाने दि. ०१.०३.२००० रोजी व दि. १०.०९.२००१ मंजूर केलेल्या सूधारीत विकास योजनेनूसार मौजा - बाबुलखेडा, खसरा क्र. ५७/२, ५८/२५ व मौजा - अजनी, खसरा क्र. १२२ येथील एम्प्रेस मिल को.ऑप. हाऊ. सोसायटी मधील "आ.क्र. एमएस-२६ (फायर स्टेशन)" क्षेत्र - ०.६९१२ हेक्टर आर. जागा राखीव असून उक्त

आरक्षणाचे समुचित प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिका आहे. सदर आरक्षणाखालील जागेकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे.

शासन निर्णय क्र. नासुप्र-१६२४/प्र.क्र. ४०/नवि-२६, दि. १६.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयानूसार मौजा – बाबुलखेडा, मौजा अजनी इम्प्रेस मिल को.ऑप.हॉऊ. सो.लि. येथील सूमारे १०५४.८० चौ.मी. जागेवर अखिल भारतीय ओबीसी भवन बांधण्याकरीता शासनाने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयातील "अट क्र. १ मध्ये शासनाने दि. १० सप्टेंबर २००१ रोजी मंजूरी दिलेल्या सूधारीत विकास योजनेनूसार खसरा क्र. ५७/२, ५८/२५, मौजा- बाबुलखेडा, खसरा क्र. १२२, मौजा – अजनी, एम्प्रेस मिल को.ऑप. हाऊ. सोसायटी लि. च्या अभिन्यासातील जागा "फायर स्टेशन (एमएस-२६)" या आरक्षणाने प्रस्तावित आहे. सदर मागणी केलेली १०५४.८० चौ.मी. जागा फायर स्टेशन करीता आरक्षित असल्यामुळे आरक्षणाच्या फेरबदलाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ नूसार प्रस्ताव समुचित नियोजन प्राधिकरण नागपूर महानगरपालिका यांना नागपूर सूधार प्रन्यासव्दारे सादर केल्यानंतर त्यास नागपूर महानगरपालिकेने शासनास सादर करून याबाबत मंजूरी प्राप्त करून घेण्यात यावी, असे नमूद आहे. शासनाने दि. १६.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयामध्ये मौजा - बाबुलखेडा, खसरा क्र. १२२ येथील मंजूर विकास योजनेतील "आरक्षण क्र. एमएस-२६ (फायर स्टेशन)" करीताच्या राखीव जागेपैकी १०५४.८० चौ.मी. क्षेत्राची जागा उक्त आरक्षणातून वगळून सार्वजनिक/निमसार्वजनिक विभागात समाविष्ठ करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-३७ अन्वये कार्यवाही करण्याबाबत निदेश दिलेले आहे.

मौजा- बाबुलखेडा, खसरा क्र. ५७/२, ५८/२५ व मौजा- अजनी, खसरा क्र. १२२ येथील एम्प्रेस मिल को. ऑप. हॉऊ. सोसायटी मधील मंजूर विकास योजनेनूसार "आरक्षण क्र. एमएस-२६ (फायर स्टेशन)" क्षेत्र ०.६९१२ हेक्टर आर. राखीव जागेपैकी ०.१०५ हेक्टर आर. जागा या आरक्षणातून वगळून "सार्वजनिक -निम-सार्वजनिक" या विभागात समाविष्ट करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(अ) अन्वये फेरबदल प्रस्तावित करण्यात येत आहे.

या करीता प्रशासकीय ठराव पारीत करून सदर फेरबदल प्रस्तावाबाबत संपूर्ण वैधानिक कार्यवाही केल्यांनतर सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करणे आवश्यक आहे. याकरीता सदर फेरबदलाची सूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे त्यावर प्राप्त आक्षेप/ हरकतीवर सूनावणी देऊन योग्य निर्णय घेऊन व तदनंतर उक्त प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वीत करणेकरीता प्रस्तावित आहे. फेरबदलाचा सदर विषयाच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.